वर्ष १० वे  विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24  संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२०  वार-शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# अर्थमंत्री सीतारमण यांच्याकडून देशाचे बजट सादर

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता



## अर्थमंत्र्याकडून विविध घोषण

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदेत आज २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केलं. या केंद्रीय अर्थसंकल्पात अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर करताना सुरुवातीला शेतकऱ्यांसाठी मोठ्या घोषणा केल्या. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आपण सादर करत असणारं अर्थसंकल्प अतिशय महत्त्वाचं असल्याचं अर्थमंत्री यावेळी म्हणाल्या. निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर करत असताना सुरुवातीलाच एका महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधलं. आमच्या अर्थसंकल्पाचं ध्येय हे GYAN वर लक्ष केंद्रीत करणारं आहे.**

GYAN म्हणजे गरीब, युवा, अन्नदाता आणि नारीशक्ती, असं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. मध्यमवर्गीयाचं जीवनमान उंचावेल हेच आमचं ध्येय असल्याचं अर्थमंत्री सीतारमण यावेळी म्हणाल्या. यावेळी निर्मला सीतारमण यांनी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या. बजेटमधील १० महत्त्वाच्या घोषणा १) प्रधानमंत्री धनधान्य योजनेची घोषणा : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य योजनेची घोषणा केली. सर्व राज्यांसह केंद्र सरकार ही योजना अंमलात आणेल, असं अर्थमंत्र्यांनी जाहीर केलं. या योजनेच्या माध्यमातून देशभरातील १.७ कोटी शेतकऱ्यांना मोठी मदत मिळेल, असं सीतारमण यांनी सांगितलं. २) गरीब, युवा, महिला आणि शेतकरी यांचं जीवनमान उंचावेल याकडे आमचा फोकस असणार आहे. फार्म ग्रोथ, ग्रामीण विकास, ▶▶ पान २ वर

### अर्थसंकल्पात काय स्वस्त?

एलईडी-एलसीडीच्या किंमती कमी होणार, टीव्हीचे पार्ट्स स्वस्त होणार, मोबाईल स्वस्त होणार, मोबाईलच्या बॅटरीसंदर्भातील २० भांडवली वस्तूंना सूट,कॅन्सरवरची औषधे,लिथियम बॅटरी ,इलेक्ट्रीक वाहने,सोलार सेट ,चामड्यांपासून बनणाऱ्या वस्तू, लिथियम बॅटरीत लागणारी कोबाल्ट पावडर , भारतात तयार होणार कपडे स्वस्त होणार, चामड्यांपासून बनवलेल्या वस्तू स्वस्त होणार , गोठवलेल्या माशांच्या पेस्टवरील मूलभूत सीमाशुल्क ३०% वरून ५% पर्यंत कमी करणार

### मेडिकल कॉलेजेसमध्ये जागा वाढवणार

केंद्र सरकारने मेडिकलच्या जागाही वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये १० हजार जागा वाढवण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. पुढील ५ वर्षात वैद्यकीय जागांमध्ये ७५,००० ने वाढ करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

### अर्थसंकल्पामधील मोठे निर्णय

* डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी विशेष योजना – पुढील ६ वर्षे तूर, मसूर आणि इतर डाळींच्या उत्पादनावर भर
* कापसाच्या उत्पादनासाठी ५ वर्षांचे मिशन,यामुळे देशातील वस्त्र उद्योगाला चालना मिळणार
* किसान क्रेडिट कार्डवरील कर्ज मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढवली
* बिहारमध्ये मखाना बोर्ड स्थापन – छोट्या शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना फायदा
* लघुउद्योगांसाठी विशेष क्रेडिट कार्ड योजना–पहिल्या वर्षी १० लाख क्रेडिट कार्ड जारी केली जाणार

### काय महाग होणार

सर्वसामान्यांचे घर घेण्याचं स्वप्न मात्र महागणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात घरं महागणार आहेत. तर या सोबतच विदेशी कपडे महाग होणार आहेत. फ्लॅट पॅनेल डिस्प्ले महाग होणार आहेत.बऱ्याच आवश्यक वस्तूंवर सीमाशुल्क कमी किंवा सूट दिली जाणार आहे. परंतु काही वस्तू महाग होणार आहेत, विशेषतः तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात.

# चंदनसावरगावजवळ दोन कारची समोरासमोर धडक

## तीन ठार, एक गंभीर जखमी



दिंद्रुड , (दिव्य न्युज):- अंबाजोगाई-केज मार्गावरील चंदनसावरगाव नजीक शुक्रवारी रात्री १०.४५ च्या सुमारास दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी आहे. मृतांमध्ये अमित दिलीपराव कोमटवार (वय ३५, रा. दिंद्रुड, माजलगाव), परमेश्वर नवनाथ काळे ( रा.खांडे पारगाव, बीड), गणपत नारायण गोरे( ४७, रा. सामनापुर ता. जि.बीड) यांचा समावेश आहे.

अपघातातील कार क्रमांक (एम एच-२३/ई ६८५२) आणि (एम एच-१२/एम डब्ल्यू-३५६३) यातील वाहन चालकांचे नियंत्रण सुटल्याने हा भीषण अपघात घडला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. परमेश्वर काळे यांचा जागीच मृत्यू झाला. तर अमित कोमटवार आणि गणपत नारायण गोरे हे गंभीर जखमी अवस्थेत होते. माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार शेंडगे, हेडकॉन्स्टेबल पठाण, हेडकॉन्स्टेबल वारे अपघातस्थळी पोहोचले. पोलिसांनी परमेश्वर काळे यांचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तर गंभीर जखमी अमित कोमटवार आणि गणपत नारायण गोरे यांना ▶▶ पान २ वर

# प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण साठी नवीन उद्दीष्ट प्राप्त

## बीड मतदारसंघातील पात्र कुटुंबांनी लाभ घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

बीड, (दिव्य न्युज):- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल ५०१८ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ३४९९ घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ ▶▶ पान २ वर

## संकटात सापडलेल्या धनुभाऊंच्या मदतीला भगवान गड..

# झटक्यात वंजारी समाज राहिला मुंडेंच्या पाठिशी उभा; महंत गेम पलटवणार?

बीड, (दिव्य न्युज):- राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे फायरब्रँड नेते धनंजय मुंडे हे सध्या मोठ्या अडचणीत सापडले आहेत.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या आणि दोन कोटींची



खंडणी प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडसोबतच्या कनेक्शनमुळे मुंडेंच्या सुसाट 'प्रगती एक्सप्रेस'ला चांगलाच ब्रेक लागला.विरोधकांकडून एकापाठोपाठ होत असलेल्या गंभीर ▶▶ पान २ वर

# आम्हाला भगवानगडाची मदत नको, त्यापेक्षा न्याय द्या

बीड , (दिव्य न्युज):- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे सध्या राज्यातील वातावरण तापलं आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने आंदोलन केले जात आहे. त्यातच भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांना क्लीनचिट दिली आहे. धनंजय मुंडे हा खंडणी घेऊन जगणारा माणूस नाही. त्यांच्यासोबत मीडिया

### धनंजय देशमुखांनी ठणकावून सांगितले

ट्रायल सुरू आहे असे विधान भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री म्हणाले. यासोबतच संतोष देशमुखांच्या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी भगवानगड उचलायला तयार आहे, असेही नामदेव शास्त्रींनी सांगितले. आता यावर संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी प्रतिक्रिया दिली आहे.

धनंजय देशमुख यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना भगवान गड कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी उचलायला तयार आहे, याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भाष्य केले. आम्हाला ▶▶ पान २ वर

## पंकजा यांच्या विरोधासाठी दिल्लीच्या हयात हॉटेलात

# धनंजय मुंडे आणि नामदेव शास्त्रींचा प्लान

**मुंबई , (दिव्य न्युज):- धनंजय मुंडे हा खंडणी घेऊन जगणारा माणूस नाही. त्यांच्यासोबत मीडिया ट्रायल सुरू आहे. राजकीय स्वार्थासाठी जातीय तेढ या निमित्ताने निर्माण होत आहे. पक्षाचे नेते यांना देखील याची जाणीव की मुंडे गुन्हेगार नाही. धनंजय मुंडे यांनी किती सोसावं? असे विधान भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी केले आहे. त्यांच्या या विधानानंतर आता यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यातच आता राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या एका नेत्याने धनंजय मुंडे आणि नामदेव शास्त्रींवर गंभीर आरोप केले आहेत.**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राजाभाऊ फड यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना धनंजय मुंडे आणि नामदेव शास्त्रींबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी थेट भाष्य करत गंभीर आरोप केले. यावेळी त्यांनी महादेव मुंडे हत्या प्रकरणीही भाष्य केले.



नामदेव शास्त्री महाराज यांनी संपूर्ण प्रकरण तपासून आपली भूमिका मांडली पाहिजे होती. भगवान गडाच्या मागून धनंजय मुंडे हे राजकारण करत आहेत. नामदेव शास्त्री महाराज यांची भूमिका मला तरी पटलेली नाही. पंकजा मुंडे यांना सुद्धा धनंजय मुंडे यांनी त्रास दिला आहे. पंकजा मुंडे यांनी भगवान गडावर २०१६ ला भाषण करु नये ▶▶ पान २ वर

# ...अन् वाल्ह्याचा वाल्मिक करून गेले

## फडणवीसांचे विश्वासू सदाभाऊ खोत यांची मुंडे, शास्त्रींवर टीकास्त्र

मुंबई , (दिव्य न्युज):- मंत्री धनंजय मुंडे यांना पाठिंबा दिल्याने भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री हे टीकेचे धनी होऊ लागले आहे. त्यांच्या निर्णयाचा राजकीय वर्तुळात पडसाद उमटू लागला आहे. यामुळे पुन्हा एकदा राज्याचे राजकीय वर्तुळ पेटले आहे.रयतेला चार दिवस सुखाचे मिळावेत, त्यांनी गुण्यागोविंदाने राहावे. असे संदेश देणारे संत तुकोबा कुठे आणि दुसऱ्या बाजूला हे संत कुठे? राजकारणाचं गुन्हेगारीकरण करायचे आहे का? यशवंतराव साहेबांच्या काळामध्ये गुन्हेगारीला आसरा नव्हता. पण अलीकडच्या काळामध्ये धनदांडग्यांचे राजकारण सुरु झाले आहे. ते राजकारण गुन्हेगारीच्या आश्रयाखाली वावरायला लागले. इंडियावादी संत जन्मले अन् वाल्ह्याचा वाल्मिक करून गेले, असा घणाघात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू तथा रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत यांनी केला आहे.तसेच सदाभाऊ खोत यांनी ▶▶ पान २ वर



# मुंडेंच्या चेलेचपाट्यांनी देशमुखांचा खून पाडला, तो शास्त्रींना मान्य आहे का?

## अंबादास दानवेंचा मुंडेंवर प्रहार


मुंबई , (दिव्य न्युज):- संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर मागील दीड महिन्यापासून मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप असून विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. त्यातच गुरुवारी धनंजय मुंडे हे भगवानगडावर दाखल झाले होते. शुक्रवारी (दि. ३१) ▶▶ पान २ वर



## शासनाकडून राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी

# शासनाचा हा निर्णय रोजेदारांवर पडणार भारी!

बीड , (दिव्य न्युज):- शासनाकडून या महिन्यापासून राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने शासनाचा हा निर्णय रोजेदारांवर भारी पडणार असून शासनाला जर राशन कार्ड धारकांना ज्वारी द्यायचीच असेल तर ती गव्हा ऐवजी नको तांदळा ▶▶ पान २ वर



# भगवानगड धनंजय मुंडेंच्या पाठीशी; अजित पवारांवर दबाव!

## हत्या करणाऱ्यांची मानसिकता का बिघडली हे शोधायला हवे, अगोदर त्यांनाही मारहाण झाली होती : नामदेव शास्त्री

**डॉ. नामदेव शास्त्री, महंत भगवानगड यांचे वक्तव्य त्यांच्याच शब्दांत...**

धनंजय मुंडेंची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. तो खंडणीवर जगणारा नाही. तरीही त्याला गुन्हेगार ठरवलं जातंय. काही नेत्यांनी जातीयवाद उफाळून आणला. पण भगवानगड भक्कमपणे त्याच्या पाठीशी आहे. ज्या लोकांनी हत्या केली त्यांची मानसिकता का बिघडली याचे कारण शोधायला हवे. अगोदर त्यांना झालेली मारहाण दखल घेण्याजोगी होती. धनंजयवर मीडिया ट्रायल



सुरू आहे. राजकीय स्वार्थासाठी जाती-जातीत भांडणे लावणे नेत्यांच्या अंगलट येईल. सलोखा बिघडवणाऱ्या पापी माणसाला कधीही समाधान नसते. खरा प्रकार काय आहे याची पक्षाच्या नेत्यांनासुद्धा जाणीव आहे.

**... तर धनंजय संत झाला असता**

आमच्या क्षेत्रात एवढा त्रास झाला असता तर तो (धनंजय) राष्ट्रीय संत झाला असता. एकदाच ही पाळी आली नाही. एकदा घर फुटले. धनंजयने भरपूर सोसले. उंच उडत असताना आज त्याची मानसिक अवस्था बघा. हाताला सलाइन लावले आहे. एखाद्या माणसाने किती सहन करावे. समाजाच्या भावना आमच्यापर्यंतही येतात. भविष्यात याचे परिणामही वाईट होऊ शकतात.

## एका चापटीच्या बदल्यात खून करण्याची मानसिकता असेल तर दिवसाच मुडदे पडतील : धनंजय देशमुख

**धनंजय देशमुख, दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू यांचे वक्तव्य त्यांच्याच शब्दांत...**

'संतोष देशमुखने ज्या आरोपीला चापट मारली, त्याच्यावर २२ गुन्हे आहेत. एक चापट मारली म्हणून त्यांनी एवढा भीषण खून केला. एका चापटीच्या बदल्यात त्यांनी आम्हाला १० चापट मारल्या असत्या तरी चालले असते. त्या आरोपींची मानसिकता काय असेल असे महाराज सांगत असतील, तर मग आज आमची मानसिकता काय झाली असेल त्याचेही उत्तर दिले पाहिजे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आरोपींना फाशी होणार असं म्हटलंय, आता आम्ही त्याचीच वाट बघतोय, तीच आमची मानसिकता आहे. एका चापटीच्या



बदल्यात खून करायची तुमची मानसिकता असेल तर तुम्ही समाजाचे देणं लागत नाहीत हे स्पष्ट झालेय. पण, अशी जर मानसिकता कुणी केली तर दिवसा मुडदे पडतील. या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा जातीय संघर्ष नाही, संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात न्याय मागण्यासाठी अठरापगड जातीचे लोक लढत आहेत. त्यामुळे हा जातीय संघर्ष नसून विकृतीच आहे.'

## मंत्रिपद वाचवण्यासाठी समाजाची ढाल हे मुंडे यांचे अखेरचे डावपेच

वाल्मीक कराडमुळे धनंजय मुंडे अडचणीत आलेत. त्यांच्या राजीनाम्यासाठी भाजपसह राष्ट्रवादीतूनही दबाव वाढला. केवळ राजकीय आरोप नव्हे तर आता कोर्टात याचिकाही दाखल झाल्यात. मुंडेंची रोज नवनवीन प्रकरणे समोर येत असल्याने सरकारची प्रतिमाही डागाळतेय. अजित पवारही आता पाठराखण करू शकत नाहीत. या वेळी समाजाची ढाल पुढे करून पवारांवर दबाव आणण्यासाठी मुंडेंनी भगवानगड व महंतांचा 'आश्रय' घेतल्याचे मानले जाते.



**धनंजय मुंडे :** 'संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फासावर लटकवा, अशी माझी पहिल्या दिवसापासून भूमिका आहे. तरीही जे काही राजकारण सुरू आहे ते माझा राजीनामा घेण्यापुरता आहे का? एका समाजाला किंवा मला टार्गेट करून फायदा घ्यायचा का, हा ज्याचा-त्याचा विचार आहे.'



**मनोज जरांगे :** जर महंत आरोपीचे समर्थन करत असतील तर ते दुर्दैवी आहे. तसे बोलणे म्हणजे गुंडगिरीला प्रोत्साहन देणारे आहे. बाबाजी असे बोलतील वाटत नाही, पण बोलले असतील तरी दुरुस्ती करतील. जे तिथे गेलेत त्यांनीच शिकवलं असेल. महंत कुणाला घाबरून बोलले असतील तर ते दुर्दैवच आहे.



**अंजली दमानिया :** 'नामदेव शास्त्री जे बोलले ते ऐकून मला दुःख झाले. धनंजय मुंडेंबद्दल जे आक्षेप घेतले जात आहेत, ते पुरावे बाहेर येत आहेत. कदाचित हे नामदेव शास्त्रींना माहीत नसावे. ते सर्व पुरावे मी महंतांना दाखवणार आहे. कदाचित यानंतर त्यांचा विश्वास बसेल.'

पान ४ वरून

## शिवसंग्राम जिल्हा कार्यकारिणी

झोकून काम करण्याची तयारी नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठेवा .प्रत्येकाने जबाबदारी ओळखून जबाबदारीने काम करावे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून १००% कामाची अपेक्षा आहे.नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका समोर ठेवून या निवडी करण्यात आलेले आहेत. शिवसंग्राम अंतर्गत आगामी काळात नवीन आघाडी तयार केल्या जातील. ग्रामीण व शहरी भागात जास्तीत जास्त कार्य करावे. येत्या काळात जास्तीत जास्त पदाधिकारी कार्यकर्त्यांचे जाळे बीड जिल्ह्यात करावयाचे आहे. पक्षाची शिस्त पाळा.पक्षामध्ये एक कुटुंब म्हणून वागा. तरुणांनी बदल करायची हिंमत दाखवली पाहिजे सकारात्मकता, आक्रमकपणा कार्यकर्त्यांने अंगी बनवावा. सदैव हिरोच्या भूमिकेत रहा,आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती संपूर्ण जागा स्वहिमतीवर लढायच्या आहेत मराठा आरक्षण, अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांचे स्मारक,शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याकरिता यापुढील वाटचाल करायचे आहे. सोशल मीडियावर सतर्क रहा,शिवसंग्रामचा झेंडा डौलाने फडकवत दिलेल्या जबाबदारीला जागा, संघटनेला व स्वतःला मोठे करा अशा स्पष्ट शब्दांत उपस्थित कार्यकर्त्यांना शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी मार्गदर्शन केले.

## विद्यार्थ्यांच्या पोषण

विभागाने मंगळवारी या सुधारणांची घोषणा करणारा सरकारी आदेश जारी केला आहे. दरम्यान याबाबत राज्याच्या शालेय विभागाकडून माहिती देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत लोकसहभाग वाढवून विद्यार्थ्यांना पौष्टिक व वैविध्यपूर्ण आहार पुरविण्यासाठी शाळांमध्ये स्नेहभोजन उपक्रम राबविण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत, अशी माहिती राज्य शासनाकडून देण्यात आली आहे. तसेच शालेय व्यवस्थापन समितीस शक्य असल्यास शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अंडा पुलाव व गोड खिचडी, नाचणी सत्व याचा लाभ देण्याबाबतचा पर्याय शाळांना देण्यात आला असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

## जाती तोडा समाज जोडा

कामे करण्यावर आपण भर दिलेला आहे. गडाच्या भक्तांकडून वारंवार होणार्या मागणीचा विचार करून यासाठी आपण प्रमत्न करत असतो मनात भाव ठेवून कुठलेही भक्ती करा गोरक्षनाथ टेकडीचा भाविक-भक्त मोठ्या प्रमाणात आहे. वैकुंठवासी किसन बाबा मांनी अखंडपणे सुरू केलेली ही परंपरा मठाधिपती नवनाथ बाबा यांनी कायम ठेवली असून दरवर्षी मोठ्या प्रमाणात सप्ताह साजरा करत असतात आणि परिसरातील भक्तांना एकत्रित करून घेतात. या ठिकाणी जात पात धर्म कुठलाही भेद न ठेवता सर्व जाती धर्मातील भाविकांना एकत्रित केले जाते. बीड जिल्ह्याची ही परंपरा मोठी आहे वारकरी सांप्रदाय हे बीड जिल्ह्याचे वैभव असून ते टिकवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे. या ठिकाणी असलेल्या रस्त्याची समस्या फरशी आणि कंपाउंड यासाठी प्रस्ताव देऊन तो मंजूर करून आणू असेही ते म्हणाले. यावेळी ह.भ.प.शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज, ह.भ.प.अखंडानंद गिरी महाराज, माउली महाराज वडवणीवर, माजी मंत्री बदामराव पंडित, माऊली महाराज बेदरकर, गंगाधर घुमरे, अरुण डाके, सखाराम मस्के, अरुण लांडे, हनुमान देवकते, नारायण देवकते, दादासाहेब लांडे, बंडू गाडीवान, चंद्रकांत फड, जनार्दन जोगदंड, बाबुराव करांडे, दिनकर लांडे, कांतराव डोईफोडे, सुनील थोरात, रामा भोगे, सोमनाथ माने, ओमप्रकाश खवतड, शाम काकडे, कैलास देवकते, नागेश शिंदे, बंडू लांडे, परमेश्वर थापडे यांच्यासह परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मिल्लीया महाविद्यालयाच्या

आली, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता,आरोग्य, पर्यावरण, साक्षरता, प्लास्टिक मुक्त अभियान, राष्ट्रीय एकात्मता तसेच बालविवाह प्रतिबंध याविषयी जनजागृती निर्माण व्हावी, श्रमदान व वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन यांचे महत्त्व तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकास व सामाजिक प्रबोधनासाठी विविध वक्त्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती असे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. शेख रफीक यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी शेख जशनैन व जूनैद तंबोली यांनी शिबिराबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी मौजे कामखेडाच्या सरपंच श्रीमती शेख मीना बेगम यांनी विद्यार्थी घडविण्याचे काम हे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होते, विद्यार्थ्यांनी लोकांमध्ये ग्राम स्वच्छता,आरोग्य, बालविवाह प्रतिबंध, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, डिजिटल साक्षरता याविषयी जनजागृती निर्माण केली व त्यांनी गावामध्ये सात दिवस केलेले कार्य कौतुकास्पद आहे असे सांगितले. पत्रकार श्री. सी.आर. पटेल सर यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी करावा तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आरोग्य, स्वच्छता व श्रमदानाचे महत्व समजून घ्यावे व त्याचा उपयोग गावाच्या, समाजाच्या प्रगतीसाठी करावा, राष्ट्रीय सेवा योजनेची शिकवण नॉट मी.. बट यू ..आपल्या जीवनात आत्मसात करावी असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलियास फाजील यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त तसेच समाजकार्य करण्याची आवड निर्माण व्हावी व त्यांनी देशाचे चांगले नागरिक व्हावे यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर आयोजित करण्यात येते तसेच शिबिरात स्वयंसेवक विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास व समाजाबरोबर एकरूप होण्याची संधी मिळते असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा संस्थेचे सचिव श्रीमती खान सबिहा बेगम यांनी एक चांगला व्यक्ती होण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच चांगले संस्कार होणे आवश्यक आहे व विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी असे सांगितले. कार्यक्रमास पदव्युत्तर विभागाचे संचालक तथा एनईपी सेलचे अध्यक्ष प्रोफेसर सय्यद फरीद अहमद नेहरी, नॅक समन्वयक प्रोफेसर अब्दुल अनीस, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापकवृंद, कर्मचारीवृंद, कामखेडाचे ग्रामस्थ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर मिर्झा असद बेग यांनी तर आभार डॉ. शेख रफीक यांनी व्यक्त केले.

पान १ वरून

## चंदनसावरगावजवळ

आणि गणपत नारायण गोरे यांना आंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला.

दरम्यान, अमित कोमटवार यांच्या कारमधील जखमी विष्णू धोतरे ( अंबाजोगाई) यास अधिक उपचारासाठी पुण्याकडे रवाना करण्यात आले आहे. तर दूसरा जखमी विनोद शिंदे आणि अविनाश कुराडे ( अंबाजोगाई) यांचायवर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहे.मयत अमित (विकी) कोमटवार हे दिंद्रुड येथील माजी सरपंच अजय कोमटवार यांचे बंधू होते. ग्रामस्थांच्या मदतीसाठी धावून येणाऱ्या अमित यांच्या मृत्यूची वार्ता वाऱ्यासारखी पसरली असून गावात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, वडील-आई, दोन भाऊ असा परिवार आहे. अंत्यविधी दिंद्रुड येथे कोमटवार यांच्या शेतात आज, शनिवारी ( दि. १) दुपारी ३ वाजता होणार असल्याची माहिती नातेवाइकांनी दिली आहे.

## प्रधानमंत्री आवास

घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

आर्थिक मागणी झाल्यास संपर्क करा

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर आर्थिक मागणी झाल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## आम्हाला भगवानगडाची

भगवानगडाची मदत नको, न्याय पाहिजे, असे धनंजय देशमुख म्हणाले.या प्रकरणातील आरोपी फरार करण्यात ज्यांचा ज्यांचा संबंध आहे, त्यांना कुणी कुणी पैसे पाठवले. या सर्व गुन्हेगारीला बळ देणाऱ्या ज्या कुणी व्यक्ती आहेत त्यांचे नावे घोषित करावेत. गुन्हेगारांना फरार करताना मदत केली. अशा व्यक्तींचीही नावे घोषित करावीत. फेसबुक पोस्टच्या कमेंटमध्ये धमकी येतात त्या संदर्भात पोलीस अधीक्षक यांना काल पुरावे दिलेले आहेत. त्यात एक दोन दिवसांमध्ये कारवाई होईल. गेल्या ५३ दिवसांपासून तपास योग्य दिशेने होत आहे. त्याचा रिझल्ट असा आला पाहिजे की आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. आमचे हीच मागणी आहे की आम्हाला यात न्याय मिळायला पाहिजे, असे धनंजय देशमुख म्हणाले.आरोपींना एक चापट मारली. एवढ्या पुरतच नामदेव महाराज शास्त्री यांना सांगितले आहे. शिष्टमंडळ आणि गावकरी आम्ही सगळे भगवान गडावर जाणार आहोत. गेल्या २८ मे पासून आतापर्यंत काय काय घडलं, खंडणी कशाप्रकारे मागितली, खून कसा झाला, संतोष देशमुख यांच्यावर कुठले गुन्हे आहेत का, हे पण आम्ही त्यांना दाखवणार आहोत आणि आम्ही त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर घेणार आहोत, असेही धनंजय देशमुखांनी म्हटले.

संतोष देशमुख कुटुंबावर काय आघात झालेले आहेत या ५३ दिवसांमध्ये सगळ्या राज्यभरातून संप्रदाय सामाजिक क्षेत्रातील सगळे लोक इथे आलेले आहेत. ते प्रत्यक्ष संतोष अण्णा देशमुख यांचं गाव, त्यांचं काम यावर प्रतिक्रिया दिली आहे. मरताना तो माझ्या कुटुंबासाठी मला जिवंत ठेवा असं न बोलता माझ्या गावासाठी जिवंत ठेवा असं बोलला. यातून त्याला त्याचं गाव किती महत्त्वाचं होतं, त्यात ही भावना महत्त्वाची आहे. गेल्या ५३ दिवसात ज्यांनी कोणी बघितले नाही, त्यांना हे समजणं शक्य नाही. जे कुणी इथे आले त्यांना घाव समजलेला आहे. त्यामुळे नामदेव शास्त्री यांना हे सगळं समजल्यावर आरोपी आणि संतोष अण्णाविषयी त्यांचे काय उत्तर येते, हे बघणं आमची जबाबदारी आहे, असे धनंजय देशमुख म्हणाले.

एक थेंब रक्त सांगितले की त्यांना वाईट वाटलं. पण संतोष देशमुख यांचे कृकर्त्यांनी हाल केले, त्यांच्या गाडीवर फोटो कोणाचे होते, ज्या ऑफिसमध्ये बसायचे तिथे कुणाचे फोटो होते, हे सगळा क्रम ही सगळी गोष्ट आम्ही नामदेव शास्त्री महाराजांना दाखवणार आहोत. त्यानंतर त्यांची प्रतिक्रिया महत्त्वाची आहे. गेल्या ५३ दिवसांपासून आमच्या कुटुंबाच्या शैक्षणिक सामाजिक या सर्व गरजा राजकीय/ सांप्रदायिक,सामाजिक यांनी ह्या गोष्टी उचल्लूया आहेत. त्यामुळे आता आम्हाला ती गरज नाही. न्यायाची गरज आहे. मदतीची गरज माझ्या गावांनी आणि इतरांनी पूर्ण केलेली आहे, असेही धनंजय देशमुखांनी ठणकावून सांगितले.गावकरी आज गडाशी संपर्क करणार आहेत ते तिथे आहेत की नाही, जरी नसले तरी गडावर जाऊन भगवान बाबा चा आशीर्वाद घेऊन आमच्या कुटुंबाला सावरण्याचे बळ मिळावा यासाठी प्रार्थना करणार आहोत, असेही धनंजय देशमुख म्हणाले.

## झटक्यात वंजारी समाज

आरोपांनी संकटात सापडलेल्या धनंजय मुंडेंच्या पाठीशी एका झटक्यात भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्रींनी अख्खा वंजारी समाज उभा केला.

बीड सरपंच हत्याप्रकरणात बॅकफूटला गेलेल्या मंत्री धनंजय मुंडेंना भगवान गडाच्या पाठिंब्यामुळे मोठं पाठबळ मिळालं.देशमुख यांच्या हत्येनंतर मुंडेंच्या विरोधकांनी राजकीय संधी साधली. त्यात भाजप आमदार सुरेश धस आणि स्वपक्षीय आमदार प्रकाश सोळंके,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे,आमदार जितेंद्र आव्हाड, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या सर्वच राजकीय विरोधकांनी आघाडी उघडत मुंडेंना टार्गेट करण्यात येत आहे. एक ना दोन तर तब्बल ५३ दिवसांपासून मुंडेंना घेरण्यासाठी अनेक गंभीर आरोपांचं जाळं टाकण्यात येत आहे. राजीनाम्यासाठीही मोठा दबाव टाकला जात आहे.

रोजच्या राजकीय नेत्यांच्या टीका,आरोप,दाव्यांनी घायाळ झालेल्या धनंजय मुंडेंनी अखेर भगवान गडाची वाट धरली.या भेटीत त्यांनी भगवान बाबांच्या समाधीचं आणि गडाचे मुख्य महंत नामदेव शास्त्रींचंही दर्शन घेतलं.त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी शास्त्रींनी मुंडेंना गडाचा पाठिंबा जाहीर केला.तसेच त्यांनी धनंजय मुंडेंची पाठराखण केलेच शिवाय ते गुन्हेगार नाही आहे,हे मी १०० टक्के सांगू शकतो असं सर्टिफिकेटही दिलं.यावेळी महंतांनी भगवान गड धनंजय मुंडेंच्या पाठीमागे भक्कम उभा असल्याचं ठणकावत त्यांनी भाजप आणि अजित पवार यांना इशारा दिल्याचंही बोललं जात आहे. मुंडेंच्या मंत्रिपदाला धक्का लागल्यास वंजारी समाजाची नाराजी ओढावली जाईन अशी भीतीही भगवान गडाकडून व्यक्त करण्यात आली.

नामदेव शास्त्रींनी धनंजय मुंडेंच्या बाजूने कौल देण्याची ही पहिलीच वेळ नाही.याआधी त्यांनी गोपीनाथ मुंडेंच्या निधनानंतर पंकजा मुंडेंना भगवानगडावर दसरा मेळावा घेण्याला विरोध केला होता.यावरुन मोठा वादंग निर्माण झाला होता. पण महंतांनी माघार घेतली नाही.पण त्यांच्या या विरोधामागे त्यावेळी पंकजा मुंडे यांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी धनंजय मुंडेंच असल्याची चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली होती.पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यात ज्यावेळी टोकाचा संघर्ष सुरु होता,त्यावेळीही नामदेव शास्त्रींनी गडाची ताकद धनुभाऊंच्या पारड्यात टाकली. त्यानंतर मुंडे बंधू-भगिनी वाद मिटवण्यातही त्यांचाच मोठा वाटा आहे. पण नामदेव शास्त्रींची सोशल मीडियावर मोठी क्रेझ आहे. तसंच गडाचं साम्राज्य विस्तारण्यात त्यांचं मोठं योगदान आहे.पण आता याच शास्त्रींनी धनंजय मुंडेंची पाठराखण केल्यामुळे ते राजकीय नेत्यांच्या निशाण्यावर आले आहेत.

बीडचं पालकमंत्रिपदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर अजित पवारांनी पहिल्यांदाच बीडचा दौरा केला.यावेळी त्यांनी गुन्हेगारी प्रवृत्तींना थेट इशारा देतानाच मंत्री धनंजय मुंडेंनाही अभय दिल्याची चर्चा आहे.कारण त्यांनी मुंडेंना सातत्यानं लक्ष करणाऱ्या भाजप आमदार सुरेश धस यांच्यासह माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांना जिल्हा नियोजन समितीतून हटवत मोठा धक्का दिला. यामुळे निश्चितच मुंडेविरोधातल्या आक्रमणाची धार कमी होण्याची शक्यता आहे.त्यानंतर त्याचदिवशी धनंजय मुंडेंनी भगवान गड गाठला.हा योगायोग नसून त्याच्यामागे मोठी राजकीय व्यूहरचना असण्याची राजकीय वर्तुळात बोललं जात आहे.कारण इतके दिवस विरोधकांकडून सातत्यानं होत असलेल्या गंभीर आरोपांनी घायाळ झालेले मुंडेंनी कधी संयमी,कधी बचावात्मक तर कधी आक्रमक भूमिका घेत आपली बाजू मांडली होती.

राष्ट्रवादीसह महायुतीतील नेत्यांनीही मुंडेंसाठी मैदानात उतरल्याचं दिसून आलेलं नाही. त्याचमुळे कुठेतरी ते एकाकी पडल्याचं बोललं जात होतं. तसेच वंजारी समाज नेमका मुंडेंच्या पाठीशी आहे की नाही याचाही अंदाज त्यांना येत नव्हता. पण आता भगवान गडानेही पाठिंबा जाहीर केल्यानं धनंजय मुंडेंना मोठी ताकद मिळाली आहे. महंत नामदेव शास्त्रींनी गेम पलटवल्याची चर्चा आहे. त्यांनी सध्यातरी मुंडेंवरचं राजीनाम्याचं संकट दूर केल्याचं बोललं जात आहे.

## धनंजय मुंडे आणि

यासाठी काय प्लानिंग करावी यासाठी हे नामदेव शास्त्री महाराज आणि धनंजय मुंडे यांनी दिल्लीतील हयात हॉटेल मध्ये मीटिंग केली होती. त्यानंतर पंकजा ताई यांना भगवान गडावर येण्यापासून रोखण्यात आला, असा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राजाभाऊ फड यांनी केला.

धनंजय मुंडे हा समाजाचा सुद्धा होऊ शकत नाही. याने समाजातील लोकांच्या हत्या केल्या आहेत. याला मंत्रिपद प्यार झालं आहे त्यामुळे तो मंत्रिपदासाठी राजीनामा देत नाही. त्याने राजीनामा द्यावा आणि चौकशी होऊ द्यावी. नंतर ते दोषी आढळले नाही तर त्यांना मंत्रिपदासाठी पुन्हा मुख्यमंत्री घेतील ना, असेही राजाभाऊ फड म्हणाले.

महादेव मुंडे यांचे मारेकरी अजून मोकाट

महादेव मुंडे यांना मी ओळखत होतो. पण गेल्यावर्षी त्यांची हत्या परळीत झाली. त्या हत्येमध्ये मला अडकवण्याचा प्रयत्न हा धनंजय मुंडे यांनी केला. मी त्यांचा परळीमध्ये राजकीय विरोधक होतो. त्यामुळे त्यांनी मला टार्गेट केलं होतं आणि या हत्येत मला फसववण्याचा प्रयत्न करण्यात आला. खरे जे महादेव मुंडे यांचे मारेकरी आहेत ते अजून मोकाट आहेत, असा आरोपही राजाभाऊ फड यांनी केला.

तब्बल २०० हून अधिक बूथ ताब्यात घेऊन मतदान करण्यात आलं

धनंजय मुंडे हे दीड लाख मतांनी निवडणूक तर आले, पण सगळे बोगस मतांचा सगळं कारभार आहे. लोकसभेच्या निवडणुकीत बूथ ताब्यात घेण्यात आले आणि बोगस मतदान करण्यात आलं. आणि तोच प्रकार हा विधानसभेत परळी तालुक्यात झाला आहे. विधानसभेच्या निवडणुकीत तब्बल २०० हून अधिक बूथ ताब्यात घेऊन मतदान करण्यात आलं त्यामुळे धनंजय मुंडे हे दीड लाख मतांनी निवडून आले नाही तर हे शक्य नव्हतं, असेही राजाभाऊ फड यांनी म्हटले.

परळीत बूथ ताब्यात घेऊन मतदान केलं

त्यासंदर्भात मी आत्ता मुंबई हायकोर्टात याचिका केली आहे. जे बूथ कोर्टाने सेन्सेटिव्ह ठरवले होते त्या बूथमध्ये सुद्धा यांनी बोगस मतदान केलं आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत परळीत बूथ ताब्यात घेऊन त्या बूथमधून एकाच व्यक्तीने संपूर्ण गावचं मतदान केल आहे आणि मतदारांच्या बोटाला शाई सुद्धा लावली नाही. ही सगळी यंत्रणा या धनंजय मुंडेच्या ताब्यात असल्यामुळे कोण काय करणार असा प्रश्न आहे? असेही ते म्हणाले.

## ...अन् वाल्ह्याचा

आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवर देखील ट्विट केले आहे. खोत द वर लिहितात, धनंजय मुंडे १००% गुन्हेगार नाही. इतका त्रास सहन करणारा आमच्या क्षेत्रात संत झाला असता - नामदेवशास्त्री महाराज

भले तरि देऊं कासेची लंगोटी । नाठाळाचे माथी हाणू काठी

संत तुकोबांची ही वाणी गाव गाड्याला बळ देऊन जाई.

इंडिया वादी संत जन्मले, वाल्ह्याचा वाल्मीक करून गेले.

दरम्यान, याप्रकरणावर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. नामदेव शास्त्री म्हणाले की या हत्येतील आरोपींची मानसिकता खराब झाली. पण त्यांच्याकडे सगळी माहिती नसल्यामुळे ते असे म्हणाले. आज माझ्या कुटुंबाची काय मानसिकता असेल? आमची लेकरे पोरकी झाली आहेत. माझा भाऊ गेला आहे. आई-वडील म्हातारे झाले आहेत. आता आम्ही काय करायचे? आमचा भाऊ परत कुठून आणायचा? असा प्रश्न धनंजय देशमुख यांनी उपस्थित केला आहे.नामदेव शास्त्री यांना सर्वस्तरातून टीकेचा सामना करावा लागत आहे. लवकरच धनंजय देशमुख भगवानगडावर जाऊन आरोपींच्या विरोधातले पुरावे नामदेव शास्त्री यांना दाखवणार आहेत. यावर नामदेव शास्त्री कोणती भूमिका घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शासनाचा हा

ऐवजी देण्याची मागणी होण्याची शक्यता दिसून येत आहे. राशन दुकानावरून गहू बंद केल्यास सर्वसामान्य गोरगरीब जनतेला सणासुदीच्या काळात अतिरिक्त आर्थिक झळ सोसावी लागेल असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शासनाने राशन दुकानांवरून राशन कार्ड धारकांना आता गव्हा ऐवजी ज्वारी देण्याचा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील राशन दुकानांवर गहू न येता त्या ऐवजी ज्वारी आली आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्य गोरगरीब राशन कार्ड धारकांमध्ये मोठ्या प्रमाणात उलट-सुलट चर्चा होऊ लागली आहे. त्यातच इस्लाम धर्माचा रमजान महिना पुढील मार्च महिन्याच्या दोन तारखेपासून सुरू होणार आहे. रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील महिला, पुरुष, तरुण-तरुणी, आबालवृद्ध सर्वच जण रमजानचे रोजे धरतात. रमजान महिन्यात रोजा असताना मुस्लिम समाज शक्यतो पहाटे सहरीसाठी तसेच दिवस मावळताना रोजा सोडल्यानंतर जेवणासाठी गव्हाच्या पोळ्यांचाच जास्त उपयोग करतो. मुस्लिम समाजातील रोज़ेदार रमजानच्या महिन्यात ज्वारीची भाकर बनवीत नाही आणि खातही नाही. नेमके याच काळात शासनाकडून राशन दुकानांवर गव्हा ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होऊ लागली आहे. याशिवाय येत्या एप्रिल महिन्यात भारतरत्न संविधान रचयिते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सुद्धा येत आहे. यामुळे फेब्रुवारी ते एप्रिल या तीन महिन्याच्या कालावधीत मोठ्या संख्येने असलेल्या दलित-मुस्लिम समाजाच्या भावना लक्षात घेता शासनाने गहू बंद करून ज्वारी देऊ नये तसेच शासनाकडे जर ज्वारी मोठ्या प्रमाणात शिल्लक असेलच तर शासनाने ती गव्हा ऐवजी न देता तांदळा ऐवजी दिली तर एक वेळ ठीक आहे परंतु असे न करता गव्हा ऐवजी ज्वारी पाठविण्यात येऊ नये. अशी मागणी होण्याची शक्यता आहे. शासनाने याकडे जातीने लक्ष देऊन ऐन रमजान महिन्याच्या तोंडावर तसेच आगामी आंबेडकर जयंतीकडे लक्ष देऊन अन्नधान्याचा पुरवठा करावा नसता जनतेतून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण राशन दुकानावरून गहू बंद केल्यास ऐन सणासुदीच्या काळात बाजारपेठेत गव्हाचे दर वाढतील. ज्यामुळे सर्वसामान्य गोरगरीब जनतेला अतिरिक्त आर्थिक झळ सोसावी लागेल असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

## मुंडेंच्या चेलेचपाट्यांनी

नामदेव शास्त्री महाराज यांनी धनंजय मुंडे यांना भक्कमपणे पाठिंबा दर्शविला. धनंजय मुंडे यांची गुन्हेगारी पार्श्वभूमीवर नाही तरी त्यांना जाणूनबुजून गुन्हेगार ठरवले जात आहे, असे त्यांनी म्हटले. आता नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केल्यानंतर विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी जोरदार हल्लाबोल केलाय.

अंबादास दानवे म्हणाले की, संतांनी आशीर्वाद दिला पाहिजे, पण तो गुन्हेगारांना नाही. संत सर्व जाती-धर्माचे असतात. कोणत्याही एका जातीपातीचे नसतात. त्या पद्धतीने संतांनी आशीर्वाद दिले पाहिजे. धनंजय मुंडे यांच्या चेलेचपाट्यांनी संतोष देशमुखांचा खून पाडला, तो शास्त्री यांना मान्य आहे का? हा माझा सवाल आहे. मी व्यक्तिगत बोलत नाही. पण, कोणत्याही गुन्हेगारांची पाठराखण संतांनी करणे चुकीचे आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.

आज शनिवारी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यात अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहे. याबाबत विचारले असता अंबादास दानवे म्हणाले की, महाराष्ट्राच्या वाट्याला भोपळा आलेला आहे. खरं तर बिहार आणि आंध्र प्रदेशने ज्या पद्धतीने केंद्र सरकारच्या छातीवर बसून आपल्या राज्यासाठी वेगवेगळ्या विकासाचे प्रकल्प घेऊन गेले. मात्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गद्दारी करून झालेले दोन उपमुख्यमंत्री यांनी पळीभर पाण्यामध्ये म्हणजे चुल्लू भर पाण्यामध्ये डुबून जीव द्यावा. महाराष्ट्राच्या वाट्याला काही नाही. महाराष्ट्राचा भ्रमनिरास झाला आहे, असे त्यांनी म्हटले.